वृत्तांकन - सौ. शोभा भिडे, मेलबर्न, फ्लोरिडा

"विठूचा गजर मेलबर्न फ्लोरिडात"

'भेटी लागी जीवा लागलीसे आस' या तुकाराम महाराजांच्या अभंगाचा प्रत्यय 6 डिसेंबर रोजी, मेलबर्नफ्लोरिडामध्ये श्री विठ्ठल मूर्तीच्या प्रतिष्ठापनेच्या सोहळ्यात सर्व विठ्ठल भक्तांना अनुभवता आला.

गेली दोन वर्षे विठ्ठल चित्ती विठ्ठल गात्री अशी येथील मराठी बांधवांची अवस्था झाली होती. श्री. किशोर पाठारे ह्यांच्या नेतृत्वाखाली, श्री. अतुल चुंबळे, श्री. प्रशांत चोपडे आणि त्यांचे सहकारी यांच्या अथक परिश्रमाने हे पवित्र कार्य सिद्धीस गेले. विठ्ठलाची मूर्ती नारायणगावजवळील प्रसिध्द मूर्तीकार श्री. सोमनाथ बामणे ह्यांनी घडवली तर डॉ. नितीन थोरवे ह्यांच्या दातृत्वाने ती सहज साध्य झाली.

काय ते माऊलीचे रूप जणू पंढरपूरचीच विठाई ! माऊलीचा सोहळा म्हटला म्हणजे दिंडी आलीच ! उत्सव मूर्तीची पालखी, डोईवरची तुळशी वृंदावन, भगव्या पताका, टाळ मृदुंगाचा गजर, कपाळी बुक्का, गळा तुळशीच्या माळा घातलेले, उपरणी घेऊन सजलेले असे 'स्थानिक वारकरी', उत्साह नुसता दुथडी भरून वाहत होता. विठ्ठल नाम गजराने मेलबोर्न मधील 'मानवमंदिराचा' परिसर दुमदुमला होता.

भक्तांनी आणलेल्या उत्सवमूर्तीच्या पालखीचा प्रवेश मंदिरात झाला. विठ्ठल विठ्ठल, पांडुरंग पांडुरंग, पुंडरीक वरदा हरी विठ्ठल अशा नामगजरातून नारायणगावातून साकार झालेल्या विठूमाऊलीचे सर्व भक्तांना याची देही याची डोळा दर्शन झाले.

ह्या विठ्ठलमूर्तीची यथासांग पूजा श्री. संजय आचार्य व त्यांच्या पत्नी सौ. संपदा आचार्य आणि मानवमंदिराचे शास्त्री श्रीरंग आणि भूपेंद्रभाई ह्यांच्या सहयोगाने झाली.

अशा या भव्य दिव्य सोहळ्याची सांगता न्यू जर्सीच्या कलामंचचे कलाकार श्री. महेश लाड व सौ. प्रज्ञा जाधव ह्यांच्या अभंगवाणीने झाली. सोहळ्याचा शुभारंभ आणि सांगता ज्ञानेश्वरांच्या पसायदानाने झाली.